निवडणूकीच्या आचारसंहीता काळात मुंबई शिधावाटप
क्षेत्रामध्ये नवीन शिधापत्रिका वितरीत न करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन परिपत्रक क्रमांक विपआ-२०१२/ प्र.क्र.५/ नापू २८

मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२.

दिनांक :- १६ जानेवारी २०१२

पहा : शासन परिपत्रक क्र.शिवाप २००९/प्र.क्र.१००/ना.पु. २८, दि. ५ जून, २०१०

**पार्श्वभूमी :-**

विधानमंडळाच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशन, २०११ मध्ये अपात्र शिधापत्रिकांसंदर्भात विधान परिषद तारांकित प्रश्न उपस्थित झालेला होता. सदर प्रश्नाच्या उत्तराच्या वेळी सभागृहातील विविध सदस्यांनी बनावट, बोगस शिधापत्रिकांचा उपयोग निवडणूक प्रक्रीये अंतर्गत मतदारांची ओळख पटविण्यासाठी होत असल्याबाबत अनेक उपप्रश्न उपस्थित केले व याबाबत तातडीने उपाययोजना करण्याबाबत मागणी केली असता मा. मंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांनी मुंबई शिधावाटप क्षेत्रात निवडणूकांच्या आचारसंहीता काळात नवीन शिधापत्रिका वितरीत केल्या जाणार नाहीत, असे सभागृहास आश्वासन दिलेले आहे. प्रस्तुतच्या आश्वासनाची पूर्तता करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

**प रि प त्र क**

रहिवासाचा किंवा निवासाचा पुरावा म्हणून शिधापत्रिकेचा वापर न करण्याबाबत उपरोक्त परिपत्रान्वये सर्व सबंधितांना स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. वास्तविक शिधापत्रिका ही या विभागाकडून सबंधित कुटुंबाला किंवा व्यक्तिला शिधावाटप किंवा रास्त भाव दुकानातून केवळ शिधावस्तू उचलण्यासाठी वितरीत होते. अन्य कोणत्याही पुराव्यासाठी शिधापत्रिकेचा वापर अनुज्ञेय नाही. तशी स्पष्ट सूचनाही प्रत्येक शिधापत्रिकेवर छापण्यात आलेली आहे. तरीही बऱ्याच प्राधिकाऱ्यांकडून किंवा कार्यालयांकडून निवासाचा पुरावा म्हणून शिधापत्रिका विचारात घेतली जाते, असे निदर्शनास आले आहे.

विशेषत: निवडणूकीच्या काळात मतदाराचा पत्ता व ओळख पटविण्यासाठी नवीन शिधापत्रिकेचा वापर होऊ नये याकरिता दक्षता घेण्याच्या उद्देशाने मुंबई शिधावाटप क्षेत्रात महानगरपालिका निवडणूका, २०१२ च्या आचारसंहीता काळात नवीन शिधापत्रिका वितरीत करण्यात येऊ नयेत. मात्र, नवीन शिधापत्रिकांसाठी फॉर्म स्विकारण्यास हरकत असणार नाही. आचारसंहीता संपताच पूर्वीप्रमाणे नवीन शिधापत्रिका वितरीत करता येतील.

सर्व मंत्रालयीन विभागांनी वरील सूचना त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व सबंधितांच्या निदर्शनास आणाव्यात.

सदरहू परिपत्रक महाराष्ट्र शासनाची वेबसाईट www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१२०११६०९०९३९१३९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

( शुभांगी पोटे )
कक्ष अधिकारी,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रति,

१) नियंत्रक शिधावाटप , मुंबई
२) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई.
३) जिल्हाधिकारी, मुंबई शहर / उपनगर
४) सर्व उपनियंत्रक शिधावाटप, मुंबई
५) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
६) सर्व मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७) मा. राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
८) मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
९) सर्व कार्यासने, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग १०) निवड नस्ती (नापु २८)